RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक ९(६)] सोमवार, मार्च १८, २०२४/फाल्गुन २८, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**—महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . . **पृष्ठे** १-२

दिनांक १६ मार्च २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**सतिश वाघोले,**

सचिव (विधि विधान),

महाराष्ट्र शासन,

विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १८ मार्च २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९४९ चा महा. ५९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मधील, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— १९४९ चा महा. ५९.

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून, शक्य असेल तेथवर, चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :". २०२४ चा महा. २३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.